follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 * वर्ष २६ * अंक ३३२ * * सातारा * रविवार दि.१ सप्टेंबर २०२४ पाने ४ * किंमत ५/-

# राजू खरे यांचे मागणीनुसार एक कोटींचा निधी मंजूर

## मोहोळ मतदार संघातील विविध कामासाठी ग्रामविकास विभागाची मंजुरी

**पंढरपूर :** मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार उद्योजक राजू खरे यांनी, मतदार संघातील विकास साधण्यासाठी शासनाकडे निधीची मागणी केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने तर ग्रामविकास मंत्री ना.गिरीश महाजन यांच्या सूचनेनुसार ग्रामविकास विभागामार्फत एक कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

मोहोळ मतदार संघातील विकास कामासाठी,यापूर्वीही कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला होता. विविध गावातील नागरिकांचे मागणीनुसार खरे यांनी २५ड़१५ योजने अंतर्गत कामे मंजूर करण्यात यावीत.अशी मागणी मुख्यमंत्री तसेच ग्रामविकास मंत्री यांचेकडे केली होती. त्यांनी सतत केलेल्या पाठपुराव्यास यश आले असुन, मोहोळ मतदार संघातील १० गावामध्ये १ कोटी रुपयांचे कामास मंजुरी मिळाली आहे.

मोहोळ मतदारसंघातील हराळवाडी येथील अंत्रोळी रस्ता ते बाळासाहेब हराळी रस्ता खडीकरण करणे ( १० लाख रुपये ), चळे येथील अभ्यासिका केंद्र दलित वस्ती बांधण्यासाठी ( १० लाख रुपये ),उत्तर सोलापूर तालुक्यातील नरोटेवाडी येथे बाळूमामा मंदिरासमोर सभामंडप







बांधणी ( १० लाख रुपये ),उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले या ठिकाणी खुनेश्वर रोड ते दशरथ करंडे वस्ती पर्यंत रस्ता करण्यासाठी (१० लाख रुपये ), मोहोळ तालुक्यातील कोरवली येथील भीम नगर येथे समाज मंदिर बांधणीसाठी ( १० लाख रुपये ), पंढरपूर तालुक्यातील नेपतगाव या ठिकाणी समता नगर दलित वस्तीमध्ये समाज मंदिर बांधण्यासाठी ( १० लाख रुपये ), मोहोळ तालुक्यातील राम हिंगणी या ठिकाणी प्रशस्त असे ग्रामसचिवालय उभारणीसाठी ( २५ लाख रुपये ), यासह पंढरपूर तालुक्यातील फुलचिंचोली या ठिकाणी भीम नगर गोरख प्रक्षाळे घर ते नवनाथ ससाने घरापर्यंत काँक्रीट रस्ता तयार करण्यासाठी ( १० लाख रुपये ), पंढरपूर तालुक्यातील सरकोली या ठिकाणी बळी घोडके घर ते ज्ञानेश्वर आठवले यांच्या घरापर्यंत पेवर ब्लॉक बसविण्यासाठी ( ५ लाख रुपये ),याप्रमाणे निधीस मंजुरी देण्यात आली आहे.

वरील प्रमाणे निधी मंजूर करण्यात आला असून, यापुढील काळातही आणखी निधी मंजूर करून घेणार असल्याचेही राजू खरे यांनी सांगितले.

### खरे यांना बळ देण्यासाठीच कोठ्यावधीचा निधी

**मोहोळ विधासनभा मतदार संघातून उद्योजक राजू खरे हे आगामी विधानसभा निवडणुकीत आपला कार्यकर्ता आमदार व्हावा. याच प्रमुख हेतूने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष लक्ष घालून मोहोळ विधानसभा मतदारसंघासाठी राजू खरे यांच्या मागणीनुसार कोट्यावधीचा निधी दिला आहे. सरकारी निधी बरोबरच स्वतः पदरमोड करीत, खरे यांनी मोहोळ मतदार संघात विकास साधला आहे.यामुळेच राजू खरे यांचे नाव मोहोळ मतदार संघात घराघरात पोहोचले आहे.**

# सावत्र भावांना धडा शिकवा; लाडक्या बहिणीला ओवाळणीची रक्कम वाढवू

नागपूर : महायुती सरकारने लाडक्या बहिणीला रक्षाबंधनालापैसे दिले, भाऊबिजेलापणदिले जातील. हामाहेरचाआहेर आहे.हीयोजना बंद होणार नाही. तुम्ही सरकारची ताकद वाढविली हात आखडता घेणार नाही. फक्त दीड हजारावर थांबणार नाही.तेदोन हजार, अडीच हजार, तीन हजार होतील. लाडकी बहिणीला ओवाळणीचीरक्कम वाढवत जावू, असे सांगत मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांनी भविष्यात लाडकीबहिणयोजनेच्या निधीत वाढ करण्याची घोषणा केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना टप्पा दोन निधी वितरण सोहळा शनिवारी नागपुरात पार पडला. यावेळी मुख्यमंत्रीएकनाथशिंदेम्हणाले, तिजोरीतीलपैसे सर्वसामान्य लोकांचे आहेत.माझ्याबहिणींचे आहेत. त्याचावापर सर्वसामान्यांसाठी करू. करोडो बहिणींच्या चेहऱ्यावरीलआनंदपाहूनसरकारम्हणूनआनंदमिळतआहे. हीअर्थव्यवस्थेला चालना देणारी योजना आहे.रक्षाबंधनच्यादोनदिवसअगोदरपैसे जातीलअसाशब्ददिलाहोता.तोपाळला.

या योजनेचेसर्व योजनांचेरेकॉर्डतोडलेलेआहे. हीलोकप्रियझालेली योजनाआहे. त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळूसरकलीआहे.हीयोजना फसवी आहे,जुमलाआहे. पैसे येणार नाही, वाट बघत बसा, असे विरोधक म्हणायचे. सरकार पैसे काढून घेईल त्यामुळे तुम्ही पैसे काढून घ्या म्हटले. पैसे यायला लागले तेव्हा विरोधकांचे चेहरे काळे पडले.'बुरीनजर वाले, तेरामुहकाला'असा चिमटा घेतहेदेणारे सरकार आहे, घेणारे नाही. पूर्वीचे सरकार हप्ते घेणारे होते,हेबँकेत महिलांच्या खात्यात हप्ते भरणारे सरकार आहे. विरोधककितीहीकाही म्हटलेतरीहीयोजना सरकारबंदहोऊ देणार नाही... नाही... नाही, असात्रिवारसंकल्पत्यांनीव्यक्तकेला. येत्या निवडणुकीत महायुतीच्या पाठिशी आपले आशिर्वाद ठेवा, असे आवाहनही त्यांनी लाडक्या बहिणींनाकेले.

सावत्र भावांना धडा शिकवा

काँग्रेस कार्यकर्ता अनिलवडपल्लीतरआडवाचपडणार आहे. योजना बंदकरण्यासाठीकोर्टात गेला आहे. हाकुणाचा आहे याची पार्श्वभूमी तपासा. उच्च न्यायालय माझ्याबहिणींवरअन्याय करणार नाही. विरोधकांची याचिका मुंबईत फेटाळली. आता पुन्हा नागपुरात कोर्टात गेले.यायोजनेत खोडा घालणाऱ्यांना योग्य वेळी जोडा दाखवा.यासावत्र भावांना धडा शिकवा,असेआवाहनकरीतमुख्यमंत्रीएकनाथशिंदेयांनी विरोधकांवरनेम साधला.

आम्ही'सुरिक्षतबहिण'देणार

आम्हीसुरिक्षतबहिणदेखील देणार, महिलाअत्याचारातीलदोषींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी सरकार कोर्टात करणार. तुमच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारमध्ये बसलेले भाऊ घेतील,असाविश्वासहीमुख्यमंत्रीशिंदेयांनीदिला.



# वर्षभरात विनयभंगाच्या दोन हजारांहून अधिक घटना

**मुंबई :** देशातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना मुंबईत गेल्या वर्षभरात विनयभंगाचे सुमारे दोन हजार गुन्हे दाखल झाल्याची खळबळजनक माहिती उघडकीस आली आहे. तसेच, बलात्कारप्रकरणी ९०० हून अधिक गुन्हे नोंदविण्यात आल्याचे माहिती अधिकारातून निदर्शनास आले आहे. दरम्यान, एका वर्षात महिलांवरील अत्याचार, विनयभंग आणि पॉक्सो नियमांतर्गत तब्बल ४,३५१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

१ जुलै २०२३ ते जून २०२४ दरम्यान मोबाइल आणि सोनसाखळी चोरी, दरोडे, लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा (पॉक्सो) अंतर्गत गुन्हे, खून, अमली पदार्थाची विक्री, साठवणूक, सेवन आदी घटनांमध्ये २५ हजारांहून अधिक गुन्हे दाखल करण्यात आल्याची बाब माहिती अधिकार कायद्याअंतर्गत उघडकीस



आली आहे. मुंबईत १ जुलै २०२३ ते जून २०२४ या कालावधीत विनयभंगाचे २२५३ गुन्हे दाखल झाल्याची माहिती आहे. तर, बलात्काराच्या प्रकरणात ९६४ गुन्हे दाखल झाले आहेत.

मोबाइल आणि सोनसाखळी प्रकरणी ४८५, घरावरील दरोड्यासंदर्भात १३३४, पॉक्सो कायद्यांतर्गत ११३४, खून आणि खुनाच्या प्रयत्नाप्रकरणी ४४४, मद्याधुंद अवस्थेत वाहन चालविल्याप्रकरणी १२,७६७ आणि अमली पदार्थाची विक्री, साठवणूक, सेवन आदी घटनांमध्ये ८,९८२ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, अशी माहिती ही माहिती अधिकारांतर्गत केलेल्या अर्जाच्या उत्तरातून पुढे आली आहे.

वर्षभरातील नोंद गुन्हे

मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणे – १२,७६७

अंमली पदार्थ विक्री, सेवन – ८,९८२

पॉक्सो – १,१३४

दरोडो – १,३३४

विनयभंग – २,२५३

बलात्कार – ९६४

खून, खुनाचा प्रयत्न – ४४४

चोरी – ४८५

# योजनेवर स्थगिती येऊ देणार नाही

## लाकडी बहीण योजना; देवा भाऊ असेपर्यंत हायकोर्टात मोठा वकील उभा करू

**नागपूर :** काही लोक म्हणत आहेत की लाकडी बहीण योजना सुरू ठेवू नका. मी कागद घेऊन आलो. ही योजना बंद व्हावी म्हणून काँग्रेसचे अनिल वडपल्लीवार हायकोर्टात गेले आहेत.जे काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले व आ.विकास ठाकरे यांचे निवडणूक प्रमुख होते. माजी मंत्री सुनील केदार यांचे राईटहॅण्ड म्हणून ओळखले जातात. त्यामुळे यांची नियत ओळखा.पण मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सांगतो, देवा भाऊ



असेपर्यंत हायकोर्टात मोठा वकील उभा करू,काहीही झाले तरी या योजनेवर स्थगिती येऊ देणार नाही, असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजना सुरू राहणार असे आश्वस्त केले.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना टप्पा दोन निधी वितरण सोहळा शनिवारी नागपुरात पार पडला. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ही योजना रोखण्यासाठी विरोधक पहिल्यांदा मुंबईच्या न्यायालयात गेले. तेथे जमले नाही. आता नागपूरच्या न्यायालयात गेले. याची नियत समजून घ्या. नागपुरात दुसऱ्या टप्प्यात ५० लाख खात्यांमध्ये पैसे दिले आहेत. १ कोटी ६० लाख भगिनींच्या खात्यात प्रत्येकी ३ हजार रुपये जमा केले आहेत. १०टक्के महिलांनाही पैसे मिळणार नाही अशी वल्गना महाविकास आघाडीचे नेते करीत होते. त्यांना आव्हान आहे की या महिलांना पैसे मिळाले की नाही ते विचारा. लाडक्या बहिणींनो मला सांगा योजना आणून चूक केली का, ही योजने सुरू ठेवायची आहे ना, मुलींना मोफत शिक्षण सुरू ठेवायची आहे ना, महिलांना एसटीत पन्नास टक्के सवलत दिली.

# हरियाणात आता ५ ऑक्टोबर रोजी मतदान

**नवी दिल्ली :** हरियाणा विधानसभेच्या मतदानाची तारीख आता बदलण्यात आली आहे. याआधी घोषणा झाल्यानुसार १ ऑक्टोबर रोजी मतदान आणि ४ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार होती. मात्र आता ५ ऑक्टोबर रोजी मतदान आणि ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. जम्मू आणि काश्मीरचीही मतमोजणी आता ८ ऑक्टोबर रोजीच होईल, असे निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे.

बिश्नोई समाजाने १ ऑक्टोबरच्या मतदानावर आक्षेप घेतला होता. अखिल भारतीय बिश्नोई महासभा, बिकानेर या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्षांनी




शिष्टमंडळासह निवडणूक आयोगाकडे तारीख बदलण्याची मागणी केली होती. २ ऑक्टोबर रोजी बिश्नोई समाजाचा मोठा सण आहे. यासाठी हजारो बिश्नोई कुटुंब राजस्थानमधील त्यांच्या मूळ गावी असतात. शेकडो वर्षांपासून समाजातर्फे हा सण साजरा करण्यात येत आहे. यामुळे बिश्नोई समाजाचा मतदानाचा अधिकार हिरावला जाण्याची शक्यता आहे. या मागणीनंतर निवडणूक आयोगाने तारखांमध्ये बदल जाहीर केला आहे.निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, मतदारांचा मतदानाचा अधिकार अबाधित ठेवणे आणि शेकडो वर्ष जुन्या परंपरेचा सन्मान करण्यासाठी आम्ही निवडणूक पुढे ढकलत आहोत. बिश्नोई समाजाचे गुरू जांभेश्वर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ३०० वर्षांपासून ही परंपरा समाजाकडून जोपासली जात आहे.दरम्यान जम्मू आणि काश्मीरमध्ये मात्र तीन टप्प्यात निवडणूक होणार आहे. १८ सप्टेंबर रोजी पहिला टप्पा, दुसरा टप्पा २५ सप्टेंबर आणि तिसरा टप्पा १ ऑक्टोबर रोजी पार पडेल.



# कोयना, धोम, उरमोडी, तारळी धरण ९६ टक्क्यांवर

## प्रमुख प्रकल्पातील पाणीसाठा १४५ टीएमसीवर

सातारा : साताऱ्यात पश्चिम भागात मागील तीन महिन्यांपासून मुसळधार पाऊस राहिला. यामुळे कोयना, धोम, उरमोडी, बलकवडी, तारळी धरण ९६ टक्क्यांवर भरले आहे. यामुळे प्रमुख मोठ्या प्रकल्पात १४५ टीएमसीवर पाणीसाठा झाला आहे. धरणे भरल्याने वर्षभराची चिंता मिटली आहे. साताऱ्यात जून महिन्यात वेळेवर पाऊस सुरू झाला तर पुढे फारशी चिंता राहत नाही. कारण, पेरण्यांना वेळेवर सुरुवात होते. तसेच धरण, पाझर तलावातही पाणीसाठा वाढतो. मागील वर्षी मात्र, पावसाने चिंता वाढवली होती. मागील वर्षी वार्षिक सरासरीच्या ७० टक्क्यांपर्यंतच पाऊस झाला. यामुळे कोयना, धोम, कण्हेर, उरमोडी यांसारखे मोठे पाणीप्रकल्प पूर्ण भरले नव्हते.

जिल्ह्यात मागील वर्षी २८ ऑगस्टपर्यंत प्रमुख सहा प्रकल्पांत १२१.११ टीएमसी पाणीसाठा झाला होता. यामध्ये तारळी, धोम, बलकवडी आणि कण्हेर धरणांत चांगला साठा होता. तर कोयना धरणात ८१ टक्क्यांवर पाणीसाठा होता. तर उरमोडी धरणात अवघे ६ टीएमसी पाणी होते. सप्टेंबर महिन्यात पाऊस कमी झालेला होता. त्यावेळी धरणे तळाला गेली होती. त्यामुळे यंदा धरणे भरणार का? अशी चिंता होती. पण, मागील तीन महिन्यांत सतत पाऊस झाल्याने पाण्याचा प्रश्न निकाली लागला आहे. पश्चिम भागात कोयना, धोम, बलकवडी, कण्हेर, तारळी, उरमोडी असे प्रमुख सहा मोठे प्रकल्प आहेत. या प्रकल्पात १४८.७६ टीएमसी पाणीसाठा होतो. तर पूर्व भागातही नेर, आंधळी, पिंगळी, राणंद, येळीव असे लहान प्रकल्प आहेत. यावर्षी या सर्वच प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झालेला आहे. पश्चिमेकडील सर्वच प्रमुख धरणे काठावर आली आहेत. सहा प्रकल्पात सध्या १४५.४५ टीएमसीवर पाणीसाठा झाला आहे.

सर्वांत मोठे कोयना धरणाची क्षमता १०५.२५ टीएमसी असून धरणातील पाणीसाठा ९८.२५ टक्क्यांवर गेला आहे. याशिवाय धोम, बलकवडी, तारळी उरमोडी ही धरणेही भरली आहेत.

# सिंधुदुर्गातील शिवरायांच्या पुतळा का पडला?

## उदयनराजेंनी सांगितली २ प्रमुख कारणे

**मुंबई :** राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची दुर्दैवी घटना समोर आली. संपूर्ण या महाराष्ट्रात या घटनेनंतर दु:ख तसेच संताप व्यक्त केला जातो. पुतळ्याच्या बांधणी आणि देखभालीकडे दुर्लक्ष केल्याचे म्हणत राज्य सरकारवर जोरदार टीका केली जातेय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवरुन जाहीर माफी मागितली आहे. दरम्यान उदयनराजे भोसले यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. यामध्ये त्यांनी घडलेली घटना दुर्दैवी असल्याचे सांगित यावर राजकारण करु नये असे आवाहन केलंय. सिंधुदुर्गातील शिवरायांच्या पुतळा का पडला? याची उदयनराजेंनी २ प्रमुख कारणे सांगितली आहेत.

राजकोट मधील पुतळा दुर्घटना ही निश्चितच दुर्दैवी आणि अचानक घडलेली घटना आहे. देशातील सर्व जाती धर्मातील नागरीकांमध्ये या घटनेचे दु:ख आहे. पुतळा उभारणीतील कच्चा दुवे आणि निसर्गाची अवकृपा या आणि केवळ याच कारणामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याचे समोर येत आहे. त्यामुळे या अभागी घटनेचे कोणी स्वत:च्या लाभासाठी राजकारण करुन भांडवल करु नये, विशेष कोणाला लक्ष बनविणे टाळले पाहीजे. असे आवाहन खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांनी केले.

या प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्यांना कठोर शासन झालेच पाहीजे आणि समुद्रतटीय निसर्गनियमांचा आणि वातवरणीय बदलांचा पुरेपुर अभ्यास करुन, छत्रपती शिवाजी महाराज यांचा सर्वांना प्रेरणा देणारा पुतळा पुन्हा त्याच ठिकाणी उभारला जावा, असे मत आज उदयनराजे भोसले यांनी व्यक्त केले आहे.

दोषींवर कठोर शासन व्हावे

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अलौकिक कार्याचा आमच्यासह तमाम देशवासियांना सार्थ अभिमान आहे. त्यांची शिकवण आणि राज्यकारभार आजच्या घडीला सुध्दा अत्यंत उपयुक्त आहे. त्यांच्या कर्तुत्वाम धुन प्रेरणा घेवून करोडो व्यक्तींनी आपल्या जीवनाची आदर्शदायी वाटचाल केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अल्प आयुष्यातील, अतुलनीय आणि अजोड कार्य आपल्या सर्वांच्या जीवनातील प्रत्येक वळणावर एका दिपस्तंभासारखे आहे. सामाजिक स्तरातील सर्वांना सातत्याने प्रेरणा देणाऱ्या अशा थोर महापराक्रमी राजाविषयी सर्वांनाच नितांत आदर आहे. या घटनेच्या सखोल चौकशी अंती जे कोणी दोषी असतील त्यांना कठार शासन व्हावे आणि युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रेरणादायी भव्य पुतळया त्याच ठिकाणी पुन्हा दिमाखात उभारला पाहीजे असेही खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकांत नमुद केले आहे.

कोणती २ प्रमुख कारणे?

सिंधुदुर्गात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला. या दुर्घटनेमागे कच्चे दुवे आणि निसर्गाची अवकृपा ही प्रमुख कारणे असल्याचे उदयनराजे भोसले म्हणाले. हीच २ प्रमुख कारणे असून कोणीही या घटनेचे स्वत:च्या लाभासाठी भांडवल करू नये. या घटनेत विशेष कोणाला लक्ष बनवणे टाळले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. यामध्ये घटनेत दोषी असतील त्यांना कठोर शासन झाले पाहिजे. आणि समुद्र तटीय निसर्ग नियमांचा आणि वातावरणाचा बदलाचा पुरेपूर अभ्यास करून छत्रपती शिवरायांचा प्रेरणा देणारा पुतळा पुन्हा त्याच ठिकाणी उभा करावा असे आवाहन त्यांनी केले आहे.



समाजाने संयम बाळगावा

राजकोट येथील पुतळा कोसळण्याची दुर्घटना निश्चितच प्रत्येकाच्या मनाला क्लेशदायीच आणि निषेधार्य आहे. या घटनेचे भांडवल करणाऱ्यांकडून, सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारी कृत्ये होत असतील तर शिवविचारांचा पाईक असलेल्यांना ते मान्य होणार नाही. म्हणूनच समाजातील प्रत्येक घटकांनी संयम बाळगला पाहीजे.

## पुढच्या पाच वर्षात महिलांच्या खात्यात १ लाख जमा करू; अनिल देशमुखांच्या बालेकिल्ल्यात अजित पवार यांची घोषणा

नागपूर :भावाच्या नात्याने तुम्ही जी राखी मला बांधलीय त्या अनुषंगाने तुमचे संरक्षण करणे हे माझे एक भाऊ आणि सरकार म्हणून कर्तव्य आहे. राज्यातील अडीच कोटी महिलांना १५०० रुपये महिना त्यांना सक्षम करण्यासाठीचा निर्णय आम्ही घेतलाय. त्यातून दोन कोटी महिलांच्या खात्यात १५०० रुपये टाकण्याचा निर्णय घेतलाय. अजित दादा शब्दाचा पक्का आहे. त्यामुळे पुढच्या पाच वर्षात लाडकी बहीण योजनेतून महिलांच्या खात्यात १ लाख रुपये जमा होईल. अशी मोठी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे.

अजित पवार यांची जनसन्मान यात्रा आज नागपूर जिल्ह्यातील काटोल विधानसभा मतदारसंघात आली आहे. दरम्यान, काटोलच्या कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये आयोजित कार्यक्रमात अजित पवार यांनी लाडक्या बहिणींशी आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी सरकारच्या वतीने अनेक आश्वासनांचा पाऊस पाडला. काटोल हा माजी गृहमंत्री असलेल्या अनिल देशमुख यांचा मतदारसंघ असून अजित पवार गट काटोलच्या जागेसाठी आग्रही असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यासाठीच अजित पवार यांनी जन सन्मान यात्रा काटोल विधानसभा मतदार संघात ठेवली आहे. मात्र दुसरीकडे भाजप पण काटोलच्या जागेसाठी आग्रही असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे अनिल देशमुखांच्या बालेकिल्ल्यात आज अजित पवार यांची तोफ कडाडली असल्याने या जागेवर त्यांच्या पक्षाने एकप्रकारे शड्डू ठोकला असल्याचे बोलले जात आहे.

नागपूर जिल्ह्यातील काटोलच्या कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये आयोजित कार्यक्रमात अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, शेतकऱ्यांनी वीज बिलाचे टेन्शन घेऊ नये. शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करण्यात आले आहे. सोबतच ज्या शेतकऱ्यांचे जुने बील थकीत आहे त्यावरही विचार सुरु आहे.

## कोथिंबिरीला उच्चांकी भाव
### किरकोळ बाजारात ६० ते ८० रुपये दर

**पुणे :** संततधार पावसामुळे पालेभाज्यांना फटका बसला आहे. लागवड कमी झाल्याने कोथिंबीर, मेथी, पालकासह सर्व पालेभाज्यांची आवक कमी प्रमाणावर होत आहे. कोथिंबिरीसह मेथी, पालक या पालेभाज्यांना उच्चांकी दर मिळाला आहे. किरकोळ बाजारात प्रतवारीनुसार कोथिंबिरीच्या एका जुडीला ६० ते ८० रुपये दर मिळाला आहे. मेथी जुडीला ५० रुपये दर मिळाला असून, पालकही तेजीत आहे.

पुणे विभागात पावसाची संततधार आहे. पावसामुळे पालेभाज्यांच्या प्रतवारीवर परिणाम झाला आहे. सध्या मागणीच्या तुलनेत पालेभाज्यांची आवक कमी प्रमाणात होत आहे. कोथिंबीर, मेथी, पालकसह सर्व पालेभाज्यांचे दर तेजीत असल्याची माहिती छत्रपती श्री शिवाजी मार्केट यार्डमधील पालेभाजी व्यापारी राजेंद्र सूर्यवंशी यांनी दिली.

पुणे विभागातून सध्या पालेभाज्यांची आवक कमी प्रमाणावर होत आहे. पावसामुळे पालेभाज्या खराब होण्याचे प्रमाण मोठे आहे. पालेभाज्या डागाळल्या आहेत. चांगल्या प्रतीच्या पालेभाज्यांना दर मिळाले आहेत. घाऊक बाजारात मेथी, कोथिंबीर, पालकासह सर्व पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. पालेभाज्यांची नवीन लागवड होण्यास किमान महिनाभराचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे पालेभाज्यांचे दर गणेशोत्सवापर्यंत तेजीत राहणार आहेत, असे त्यांनी नमूद केले.

कोथिंबीर, मेथी या पालेभाज्यांना मागणी वाढली आहे. पुणे विभागात संततधार पाऊस सुरू असल्याने पालेभाज्या खराब झाल्या आहेत. मार्केट यार्डातील घाऊक बाजारात कोथिंबिरीच्या एका जुडीचा दर ४० ते ४५ रुपयांपर्यंत आहे.

वाहतूक खर्च, हमाली असे खर्च विचारात घ्यावे लागतात. परराज्यांतून होणारी कोथिंबिरीची आवक सध्या बंद आहे. पावसामुळे लातूर भागातील कोथिंबिरीचे नुकसान झाले आहे. किरकोळ बाजारात कोथिंबीर, मेथी, पालकवगळता अन्य पालेभाज्यांचे दर २५ ते ४० रुपयांपर्यंत आहेत.

## फलटणमध्ये डॉल्बीला बंदी कायम

**फलटण :** आगामी गणेशोत्सवात डॉल्बी किंवा कर्णकर्कश आवाजात साऊंड सिस्टीम लावण्यास शासन नियमानुसार बंदी असल्याची माहिती पोलीस निरीक्षक हेमंतकुमार शहा यांनी दिली आहे. गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाच्यावतीने तहसीलदार डॉ. अभिजीत जाधव यांनी केले.

नगर परिषद सभागृहात आयोजित शांतता समिती सदस्य, पोलिस पाटील, गणेशोत्सव मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते, गणेश भक्त यांच्या संयुक्त बैठकीत तहसीलदार डॉ. अभिजीत जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शहर पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक हेमंतकुमार शहा, ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक सुनील महाडिक यांच्यासह महावितरण, नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



डॉ. जाधव म्हणाले, संपूर्ण राज्यात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. गणपती उत्सवाला मोठा इतिहास आहे. या उत्सवात सामाजिक, सांस्कृतिक, प्रबोधनपर उपक्रमांद्वारे सर्वसामान्यांना आनंद घेता येईल असे उपक्रम राबवावेत अशी अपेक्षा आहे. गणपती उत्सव साजरा करताना स्थानिक प्रशासनाला गणेशोत्सव मंडळांनी सहकार्य करावे.

जिल्हा पोलिस प्रमुख यांच्या आदेशानुसार गणेश उत्सव काळामध्ये कर्णकर्कश साऊंड सिस्टीम लावतील अशा सगळ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करताना गणेशोत्सव मंडळांनी मंडप उभारणी, तात्पुरती वीज जोडणी, वर्गणी जमा करणे व एकूणच संपूर्ण गणेशोत्सव साजरा करताना आवश्यक त्या रीतसर परवानगी घेऊनच हा उत्सव साजरा करावा असे आवाहन पोलिस निरीक्षक हेमंतकुमार शहा यांनी केले. निरीक्षक शहा म्हणाले, गणेशोत्सव काळात सोशल मिडियावर जे मेसेज पाठवणार आहोत यामुळे कोणतीही जातीय तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. सामाजिक समतोल बिघडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. समाजातील कोणत्याही सणामध्ये बंदी घालणे, किंवा परवानगी देणे यासाठी ही बैठक नसल्याचे स्पष्ट करीत, डिजे हे किती टॉप, किती बेस यावर अवलंबून असते, गणपती उत्सव हा १० दिवस सुरु असल्याने या काळातच साऊंड सिस्टीम बद्दल चर्चा होते.

त्याच्या कर्णकर्कश आवाजामुळे नक्कीच त्रास होत असतो, अनेकांना त्याचा त्रास सगळ्यांना झाला आहे. डिजे बंदी घालणे ही फक्त पोलिसांची जबाबदारी नाही मंडळांनी काळजी घेणे गरजेचे आहे असे मत सुनील महाडिक यांनी व्यक्त केले. महाडिक म्हणाले, गणेशोत्सव काळात पोलिसांना सुद्धा सुट्टी नसते,आम्ही सुद्धा नक्कीच माणूस आहोत याचा विचार करणे गरजेचे आहे. आम्ही यामध्ये वेळप्रसंगी कडक कारवाई करणे गरजेचे असते.

## संजयकाका पाटील यांचे विधानसभेसाठी सुतोवाच

**सांगली :** जातीपातीचे राजकारण आणि जवळच्या लोकांनी केलेला विश्वासघात यामुळे लोकसभा निवडणुकीत पराभव झाला. एका पराभवाने खचून जाणारा मी नाही. दोन महिन्यांत होणारी विधानसभा निवडणूक आपणास जिंकायची आहे, असे सांगत माजी खासदार संजयकाका पाटील यांनी निवडणुकीसाठी तयारी असल्याचे जाहीर केले. मात्र, उमेदवार स्वत: की मुलगा यावर त्यांनी भाष्य टाळले.



तासगावमधील दत्त माळावर प्रभोदय मंडळाच्यावतीने शुक्रवारी दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला होता, यावेळी ते बोलत होते. तासगाव तालुक्यातील गोविंदा पथके अन्य जिल्ह्यात जाऊन लाखो रुपयांची बक्षिसे मिळवत आहेत. या मुलांचे कौतुक करावे यासाठीच हा उत्सव आयोजित करण्यात आला आहे, असे पाटील म्हणाले.

जिल्ह्यातील जनतेने आजपर्यंत मला सहकार्य केले आहे. लोकांची शक्ती, आशीर्वाद या बळाच्या जोरावर मी दोन वेळा खासदार झालो. मात्र, नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विकासापेक्षा जातीपातीचे राजकारण झाले. त्यामुळे आपणास अडचणी निर्माण झाल्या. आपण ज्यांना मदत केली त्यांनी या निवडणुकीत आपल्या सोबत विश्वासघात केला. मात्र, दोन महिन्यांत पुन्हा विधानसभेच्या निवडणुका आहेत. या निवडणुकीत आपण आपली शक्ती, ताकद दाखवून द्यायची आहे. विधानसभा निवडणूक जिंकायची आहे, असे संजयकाका पाटील म्हणाले.उद्याच्या काळात पुन्हा ताकदीने आपणास विधानसभा निवडणूक लढायची आहे. जिंकायची आहे. त्यामुळे दोन महिने ताकदीने काम करूया. विकासाचे पर्व पुन्हा नव्या पिढीच्या हातात देऊया. गतिमान विकास करूया. काहींना केवळ मोठे बोलण्याची सवय आहे. हातभर लाकूड आणि दहा हात ढलपी असं सुरू आहे,अशी टीका संजयकाका पाटील यांनी आर. आर. आबा गटावर केली.



१ सिध्देश्वर मंदिरे.



२ उमा महेश्वर मंदिर



३ रामेश्वर मंदिर



.४ ब्रह्मेश्वर मंदिर



५ केदारेश्वर मंदिर

## राजगुरुनगरमधील पाच प्राचीन शिवालये

**राजगुरूनगर :** श्रावणमास म्हणजे हिंदू धर्मानुसार अत्यंत पवित्र मास समजला जाणारा महिना. या महिन्यात शिवलींगाच्या पूजेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. या निमित्ताने राजगुरूनगरमधील

**पाच प्राचीन शिवालयांचा घेतलेला मागोवा .**

ब्रह्माने सृष्टी स्थापन केली तर विष्णूने तिचे लालन पालन केले आणि महेश (शिवशंकर) यांनी दुष्ट प्रवृत्तीचा संहार करून सृष्टीचे रक्षण केले असे या त्रिदेवांचे कर्तव्य आपण आजही श्रद्धापूर्वक मानत आहोत. त्यापैकी

भगवान शंकर यांचे पूजन देव, दैत्य आणि मानव पूर्वापार करत आला आहे. त्यामुळेच त्याला देवांचाही देव म्हणजेच महादेव असे म्हटले जाते. सर्वस्वी अनोख्या आणि विलक्षण असलेल्या या देवतेची मंदिरे देशातल्या प्रत्येक गावात

आहेत. त्यांच्या मंदिराचे प्राचिन इतिहासही गावोगावच्या संस्कृतीशी एकरूप झालेले आहेत. अशीच राजगुरुनगर शहरातील पाच प्राचीन शिवमंदिरे गावाची अध्यात्मिक परंपरा आणि वारसा घेऊन दिमाखात उभी आहेत. या पाचही शिवमंदिरांतून दर्शनासाठी श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी भक्तजनांची रीघ लागते आणि त्यामुळेच या भक्तिमय सोहळ्याला राजगुरुनगर शहराचा एक अध्यात्मिकसोहळाच मानला जातो.

जगुरूनगर शहराचे मूळ नांव खेटक असे होते आणि या खेटक शब्दाच्या अपभ्रंशामुळे पुढे खेड हे नाव प्रचलित झाल्याचे सांगण्यात येते.खेड हे एक पवित्र क्षेत्र आहे. भगवानव्यास रचित पद्मपुराणात भीमामहात्म्यात सांगितले आहे. येथेही नाशिक प्रमाणेच भीमा नदी जेथे दाक्षिणवाहीनी झाली तेथे ऋषिमुनी कुंभमेळा भरवत असत. भीमेस प्राचीन ताम्रपटातून शिलालेखातून तसेच पोथ्या पुराणातून भिमरथी असे म्हटले आहे. पूर्वी या खेटक परिसरात घनदाट जंगलात ऋषि मुनींचे आश्रम असत.भीमा नदीच्या काठावर गावच्या हद्दीत श्री सिद्धेश्वर, श्री उमामहेश्वर, श्री रामेश्वर, श्री ब्रह्मेश्वर आणि श्री केदारेश्वर ही पाच शिवलिंगे आजही आपल्या मोहक मंदिरांसह धीरगंभीर व शांत वातावरणात नादब्रह्माप्रमाणे स्थिरावली आहेत.

यापैकी सर्वात मोठे सिद्धेश्वर मंदिर हे पुण्याहून राजगुरुनगरकडे येताना उजव्या बाजूला आहे. हे मंदिर शालीवाहन राजाच्या कारकिर्दीतील असून हेमाडपंथी स्थापत्यशैलीतील आहे. पुराणकाळात येथे सिद्ध नावाच्या ऋषींनी

शिवलींग स्थापन करून योगसाधना केली होती. त्यांच्याअपार श्रद्धेने शंकराने प्रसन्न होऊन येथे सिद्धेश्वर नावाने स्वयंभू शिवलिंग तयार झाले. पुढे मंदिर बांधले व त्या बांधकामासाठी तसेच स्नानासाठी शिवलींगापुढे सिद्धमुनींनी एक

पाण्याचे कुंड खोदले. या कुंडाचे देखील घडीव दगडांनी बांधकाम केले आहे. त्यावेळी त्याला देखील दहा वर्षे कालावधी लागल्याचे सांगितले जाते. पुढे कालांतराने हे मंदिर भग्नावस्थेत पडले. काही वर्षांनी या देवालयाचा जीर्णोद्धार त्र्यंबक काशीकर मधवे यांनी करून देवालय पूर्ववत उभे केले. आपण देवालयात आत गाभाऱ्यात जाताना दाराच्या चौकटीवर संस्कृत भाषेत शिलालेख आढळतो. त्यावर खेटात म्हणजेच खेड गावात सिद्धेश्वराचे देवालय १६४७ मध्ये

विषावसुसंवत्सरात पूर्ण झाले. हे बांधणारा व्यापारी त्र्यंबक मधवा नावाचा होय. असा उल्लेख आढळतो.आणि आजही त्यांचे वंशज राजगुरुनगरमधील बाजारपेठेत पूर्वीचा होळी चौक आणि सद्यःस्थितीतील शास्त्री चौक येथे राहात

आहेत. देवळाच्या बाजूला धर्मशाळा आहेत. त्या नाना फडणवीसांनी बांधल्या. त्यांनी देवालयाच्या पूजाआर्चेसाठी काही इनाम करून दिले आहेत. देवळाच्या पुढे दीपमाळा आहेत. त्या गावातील सांडभोर, थिगळे, चव्हाण या

गावकऱ्यांनी बांधल्या आहेत. सिध्देश्वर मंदिराची व्यवस्था पूर्वापार पद्धतीने मधवे घराण्याकडे चालत आली आहे ती आजतागायत. गावात पुढे वाघनदी व भीमा नदीच्या संगमावर उमा-महेश्वर नावाचे एक लहान शिवमंदिर आहे. प्रभू श्रीराम वनवासात असताना या परिसरात वास्तव्य करून शिवपूजन केल्याचे वर्णन व या शिवलिंगाची स्थापना

मारूतीने केल्याचा उल्लेखही भामामहात्म्यात आहे. पुढे राजगुरूवाड्याच्या मागील बाजूस रामघाटावर रामेश्वर नावाचे शिवालय आहे. ब्राह्मण समाजातील काही धार्मिक विधी या घाटावर केले जातात . या मंदिराची व्यवस्था खेडकर

कुटूंबियांकडे आहे. या घाटावर अनेकसमस्याही दिसून येतात. राम घाटानजीक विष्णु मंदिर संस्थान व चंडीराम महाराजांचा मठ आहे. या मठालागत नदीकाठावर ब्रह्मेश्वर शिवालय आहे. अतिशय सुबक शिवपिंड, प्राचिन शिवमंदिर,

मंदिराच्या छतावर प्राचीन कालीन कलाकुसर आणि परिसरात गणपती, खंडोबा, विठ्ठल - रखुमाई यांच्या प्राचीन मूर्ती आहेत. चंडीराम महाराज मठात त्यांचे गुरूशेषाद्री महाराजांची समाधी व वैभवी साक्ष घेऊन विष्णु मंदिर उभे आहे. ब्रह्मेश्वराची पूजाअर्चा क्षोत्रिय या शास्त्री घराण्याकडे परंपरेने चालत आली आहे.

सर्वात शेवटी केदारेश्वर महादेवाचे प्राचीन शिवमंदिर आहे. नदीकाठावर विस्तीर्ण अशा परिसरात आणि शांत वातावरणातील या रमणीय शिवालयाची व्यवस्था दीक्षित कुटुंबीयांकडे आहे. सात वर्षांपूर्वी

जीर्णोध्दार झालेले हे शिवालय भक्तांनी गजबजलेले असते. एकाच गावात पाच शिवमंदिरे म्हणजे गावचा आध्यात्मिक इतिहास विलक्षण स्वरूपात असल्याची ग्वाही देत आहे. नाशिक, अलाहाबाद प्रमाणेच खेटक खेड - राजगुरूनगर

येथेही कुंभमेळा भरत असल्याचे ऐतिहासिक कागदपत्रांतील नोंदीवरूनदिसून येते. नाशिक येथील गोदावरी काठी असलेली अनेक मंदिरे व राजगुरुनगरला भिमा नदीतीरावर असलेली पाच शिवमंदिरे तसेच इतर मंदिरे ही तीर्थक्षेत्राशीच साम्य दर्शवितात. असे येथील परिसर अभ्यासक राजेंद्र सुतार आणि दीपाकांत राक्षे यांनी सांगितले. श्रावणी सोमवार व्रत करणारे भाविक येथील पाचही शिवालयांना आवर्जून येऊन परंपरा जोपासतात.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सहकार जपला पाहिजे अन् वाढला पाहिजे : आ. बाळासाहेब पाटील

## चरेगाव येथे ज्योतिर्लिंग सहकारी पाणीपुरवठा संस्थेची वार्षिक सभा संपन्न

**कराड** : स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी कृषी औद्योगिक क्रांतीचा पाया घातला व सहकारी कारखानदारी निर्माण करून सहकार चळवळ महाराष्ट्रभर उभी केली, आपणास सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून विकासाचे दालन दिले, त्याची धुरा स्व.पी डी पाटीलसाहेब यांनी यशस्वीपणे सांभाळून त्याद्वारे कृष्णा व कोयना नद्यांवर सहकारी तत्त्वावरील उपसा जलसिंचन योजनांची उभारणी केली, त्यामाध्यमातून जिराईत जमीन बागायत होऊन शेतकरी सभासदांचे आर्थिक जीवनमान उंचावले, हे सर्व सहकारी चळवळीमुळे झाले, हा सहकार जपला पाहिजे, वाढला पाहिजे असे प्रतिपादन आमदार बाळासाहेब पाटील यांनी चरेगाव ता. कराड येथील ज्योतिर्लिंग सहकारी पाणीपुरवठा संस्थेच्या वार्षिक सभेत केले.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन विक्रम सुरेशराव माने हे होते, सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुरेशराव माने, माणिकराव पाटील डी. बी. जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

सभेच्या प्रारंभी श्रद्धांजली ठराव मांडून उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

तदनंतर संस्थेचे सचिव भानुदास पवार यांनी सभेचे नोटीस वाचन केले, सर्व विषयांचे तपशीलवार वाचन होऊन सर्व विषय मंजूर करण्यात आले, सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची खुलाशेवार उत्तरे देण्यात आली, संस्थेस ऑडिट वर्ग 'अ' सातत्याने मिळत असल्याने सभासदांनी आनंद व्यक्त केला.



सभेस मार्गदर्शन करताना आमदार बाळासाहेब पाटील म्हणाले की, कोयना धरण ९० टीएमसी आज मितीस भरले असून ते ऑगस्ट अखेर पूर्ण भरेल, योजनेस पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होणार आहे तरी सभासदांनी योजनेवर जास्तीत जास्त उसाच्या लागणी कराव्यात व त्यासंबंधी कारखान्याने पुरविलेल्या सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. योजनेस लाईट बिल प्रति युनिट रुपये १.१६ या सवलतीच्या दरात मिळणेबाबत केलेल्या संघर्षाची माहिती देऊन त्यांनी महाराष्ट्र जलसंपत्ती अधिनियम प्राधिकरण जलदरामध्ये दहापट वाढ केली आहे, तो दर शेतकऱ्यांना परवडणारा नाही त्यासाठी शासन दरबारी प्रयत्न सुरू आहेत डॉ. भारत पाटणकर यांनी महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशनच्या पुढाकाराने कोल्हापूर येथे दिनांक २९ मे २०२४ रोजी रस्ता रोको आंदोलन केले होते, त्यामध्ये अनेक पाणीपुरवठा संस्थांनी सहभाग घेतला होता, तूर्तास शासनाने सदर वाढीस स्थगिती दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने २५ जुलै २०२४ रोजी ७.५ हॉर्सपावर पर्यंतच्या शेती पंपांना विज बिल माफी जाहीर केलेली सवलत ही सहकारी तत्वावरील संस्थांना मिळावी अशी माझी आग्रही मागणी असल्याचे सांगून ते म्हणाले गोरगरीब शेतकरी सभासद एकत्र येऊन दोन तीन टप्प्यात डोंगर कपारीत पाणी नेलेने एकत्रित हॉर्स पावर वाढलेले आहेत परंतु प्रत्येक सभासदा नुसार हॉर्स पॉवर एकदम कमी आहे, त्यांनाही वीज बिलात सवलत मिळावी.

संस्थेच्या सभासदांनी वेळेवर पाणीपट्टी भरून सहकार्य करावे व ज्या सभासदांची थकबाकी राहिलेली आहे त्यांनीही पाणीपट्टी भरावी व योजनेच्या पाण्यावर जोपासलेला ऊस सह्याद्री सहकारी साखर कारखान्याकडे गळीतासाठी पाठवावा असे आवाहन केले.

शेवटी आभार आत्माराम शितळे यांनी मांनले, सभा खेळीमेळीत संपन्न झाली,

सभेस माजी पंचायत समिती सदस्य सुरेशराव हंबीरराव माने, संस्थचे व्हा.चेअरमन संतोष शितोळे, हिम्मतराव यादव, संजय माने, प्रतापराव माने, हिम्मतराव डुबल, सरपंच देवदत्त माने, शिवाजी माने, विलास पवार, सुनील पवार, लालासो लोहार, बाबूराव माने, संजय म्हेत्रे, मानसिंग सुर्यवंशी, दिलीप माने, सुरेश पुजारी, सुभाष डुबल, हैबतराव माने, आनंदराव यादव, संपत पवार, अंकुश खालकर, आप्पा मोरे, हर्षद

## संक्षिप्त वृत्त



**मसूर :** येथे ढोल ताशा वाजवताना विद्यार्थी

### डीजेला फाटा देत सणासमारंभात घुमणार शंभुनाद पथकाचा निनाद

**मसूर** : कराड तालुक्यातील मसूर व परिसरातील सण समारंभात घुमणार माळवाडी (मसूर) येथील अॅड. दादासाहेब चव्हाण विद्यासंकुलात नव्याने सुरु करण्यात आलेल्या शंभुनाद ढोल ताशा पथकाचा निनाद.

डीजेच्या युगात डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजाला फाटा देत तरुणाईमध्ये पारंपारिक वाद्यसंस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने श्री. धनलक्ष्मी फाउंडेशनचे अध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्या पुढाकाराने अॅड. दादासाहेब चव्हाण विद्यासंकुल माळवाडी (मसूर) येथे शंभुनाद ढोल ताशा पथक नव्याने स्थापन करण्यात आले आहे. यासाठी संस्थेने नवीन बारा ढोल आणि चार ताशा खरेदी केले आहेत. पारंपरिक वाद्यांचा होणारा निनाद यामध्ये सहभागी होणारी मुले मुली यांच्या ढोल ताशाच्या आवाजाचा धरलेले ठेक्याने परिसरात संस्थेचा एक वेगळा उपक्रम पहावयास मिळणार आहे यात शंका नाही.

या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष दिलीप चव्हाण, सचिव अमित चव्हाण, सदस्या अरुणा चव्हाण , डॉ. वृषाली चव्हाण, व्यंकट पाटील सर्व विद्याशाखांचे विभाग प्रमुख यांचे सहकार्य लाभले.

या शंभूनाद ढोल ताशा पथकात विद्या संकुलातील सुमारे दीडशे ते दोनशे मुला मुलींना या वाद्यांचे प्रशिक्षण क्रीडा शिक्षक गिरीश मांडके, अर्जुन जाधव हे देत आहेत. पारंपारिक वाद्य असलेल्या या पथकामध्ये मुले-मुली हिरीरीने भाग घेत असल्याने कॉलेजच्या शैक्षणिक नावलौकिका प्रमाणे या शंभुनादचा आवाज परिसरात घुमल्याने कॉलेजची वेगळी ओळख निर्माण होणार आहे.

### राज्याच्या सुधारीत वस्त्रोद्योग धोरणामध्ये पश्चिम महाराष्ट्रावर अन्याय

**विटा : :** महाराष्ट्र राज्याचे २०२३ ते २०२८ या कालावधीसाठीचे वस्त्रोद्योग धोरण जून २०२३ मध्ये जाहीर करण्यात आले.त्यामध्ये प्रकल्प गुंतवणुकीवर भांडवली अनुदानासाठी राज्याचे वेगवेगळे ४ प्रादेशिक झोन करण्यात आले आहेत.

१ पासुन झोन ४ पर्यंत सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना ४५ टक्क्यांपासून २५ टक्क्यापर्यंत भांडवली अनुदान देण्याचे जाहीर झाले होते. तर विशाल उद्योगांना ५५ टक्क्यांपासून ४० टक्क्यांपर्यंत अनुदान जाहीर केले आहे.

यामध्ये विदर्भ, मराठवाड्यातील जिल्ह्यांचा समावेश विभाग १ व २ मध्ये ठेऊन त्यातील सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना प्रकल्प गुंतवणुकीच्या ४५ व ४० टक्के भांडवली अनुदान देण्यात येत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा, कोल्हापुर व सोलापुर हे सद्या वस्त्रोद्योग सुरु असलेल्या जिल्हे मुद्दाम झोन ४ मध्ये ठेऊन त्यांना केवळ २५ किंवा ३० टक्के भांडवली अनुदान देण्यात येत आहे. सदर वस्त्रोद्योग धोरण २०२३ ला जाहीर झाल्यावर या १५ टक्के अनुदानाच्या भेदभावाबद्दल पश्चिम महाराष्ट्रातील उद्योजकांनी अन्याय करणारे आहे. राज्यसरकाराच्या वस्त्रोद्योग धोरणाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

इचलकरंजी, विटा, सोलापूर सारख्या वस्त्रोद्योग केंद्रातील लघुउद्योजकांना स्थालांतरित होणे शक्य नसल्याने व पश्चिम महाराष्ट्रात १५ टक्के कमी अनुदानावर उद्योग उभारुन तो स्पर्धेत टिकविणे मुश्कील असल्याने पश्चिम महाराष्ट्रातील उद्योग उभारणीवर कमालीचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. अनुशेषाच्या नावाखाली पश्चिम महाराष्ट्रावर एवढा मोठा अन्याय होत असताना पश्चिम महाराष्ट्रातील आमदार खासदार व लोकप्रतिनिधी यावर काहीच बोलत नाहीत हेही कमालीचे आश्चर्यकारक आहे.

एका बाजुला जागतिकीकरणानंतर जागतिक बाजारपेठेमध्ये कमाल-गुणवत्ता व किमान-विक्री दराची जागतिक स्पर्धा निर्माण होऊन संपुर्ण जग हे एक बाजारपेठ होत असताना महाराष्ट्र राज्य शासनाचे हे राज्यातल्या राज्यात प्रादेशिक भेदभावाचे धोरण राज्याला व विशेषतःपश्चिम महाराष्ट्रास मागे घेऊन जाणारे ठरणार आहे.

> राज्य शासनाने प्रादेशिक भेदभावाचे धोरण मागे घेऊन सर्वांना समान किंवा अंशतः फरकाचे व न्यायाचे धोरण घ्यायला पाहिजे. अन्यथा प्रादेशिक अनुशेषाच्या नावाखाली पश्चिम महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्र मोडकळीस येण्याची शक्यता आहे.
>
> **– किरण तारळेकर**
> **अध्यक्ष, विटा यंत्रमाग औद्योगीक सहकारी संघ विटा**

## पर्यावरणाचे रक्षणातून मानवी जीवन सुरक्षित करूया : कोळेकर

**कराड** : सध्या मानवाच्या हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. याचे भविष्यकालीन धोके लक्षात घेऊन सर्वांनी पर्यावरणाचे रक्षण करून मानवी जीवन सुरक्षित करायला हवे, असे प्रतिपादन विज्ञान शिक्षक व पर्यावरण प्रेमी सिताराम कोळेकर यांनी केले.

श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या कन्याशाळा, मलकापूर व नांदलापूर ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने बिरोबा मंदिराच्या परिसरातील डोंगरावर वृक्षारोपण व बीजारोपण उपक्रम राबवून विद्यार्थिनी, शिक्षक व नांदलापूर ग्रामपंचायत सदस्यांनी डोंगर परिसर हिरवागार करण्याचा संकल्प केला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सुलोचना भिसे, मानसिंग लावंड सुरेश राजे, सर्व शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

## विठ्ठल रखुमाई देवस्थान विभागाचे श्रद्धास्थान व्हावे : पाटील

### मंद्रुळकोळे खुर्दतील मंदिराला दोनशे वर्षापूर्वीचा इतिहास

**ढेबेवाडी** : मंद्रुळकोळे खुर्द येथील दोनशे वर्षापूर्वीचे पुरातन असलेले विठ्ठल रुखुमाई देवस्थान या गावापुरते मर्यादित न राहता ते संपूर्ण ढेबेवाडी विभागाचे श्रध्दास्थान व्हावे यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज असल्याचे मत काँग्रेसचे प्रांतिक प्रतिनिधी हिंदुराव पाटील यांनी व्यक्त केले.

मंद्रुळकोळे खुर्द ता.पाटण येथील विठ्ठल रुखुमाई मंदिराच्या जिर्णोद्धा प्रसंगी ते बोलत होते.यावेळी शंकरराव पुजारी (महाराज) पंढरपूर, काँग्रेसचे पाटण तालुका अध्यक्ष अभिजीत पाटील, डॉ. प्रदिप धस, व्ही. टी. पाटील, रामचंद्र पाटील, निवासराव गरुड,सदाशिव कदम,प्रकाश पाटील गुढेकर तसेच मंद्रुळकोळे खुर्द येथील ग्रामस्थ, महिला, युवक उपस्थित होते.



**मंद्रुळकोळे खुर्द :** येथील श्री विठ्ठल रुखुमाई मंदिराच्या जिर्णोध्दार कामाचा शुभारंभ प्रसंगी हिंदुराव पाटील, ह.भ.प. शंकरराव पुजारी, अभिजीत पाटील व इतर

यावेळी बोलताना हिंदुराव पाटील म्हणाले, ढेबेवाडी विभागातील सर्वात जूने देवस्थान म्हणून येथील विठ्ठल रुखुमाई (मठाची) ओळख असून येथे प्रत्येक वर्षी होणारा भंडारा सर्व विभागाला परिचीत आहे. त्यामुळे भाविक आवर्जून मोठ्या श्रध्देने येतात. या ठिकाणी विठ्ठल रुखुमाईचे भव्यदिव्य असे मंदिर उभे रहावे अशी येथील लोकांची अनेक वर्षापासूनची इच्छा होती ती आज ख-या अर्थाने साकार होत असल्याचा आनंद होत आहे. या मंदिराच्या जिर्णोध्दायासाठी कोणावर सक्ती नाही. सर्वांनी आपल्या परीने मदत करावी,शिवाय या मंदिराच्या बांधकामासाठी कोणत्याही शासकीय मदतीची अपेक्षा न करता आपल्या मदतीतून हे मंदिर उभे रहावे.या मंदिराच्या कामाला कुठेही अडचण येणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अभिजीत पाटील व इतर लोकांनी या मंदिराच्या जिर्णोध्दायासाठी सर्वातोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले. अरविंद कुंभार यांनी स्वागत केले तर रुपेश भोई यांनी आभार मानले.

## जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेत किर्लोस्कर विद्यामंदिरचे यश

**विटा** : अंकली फाटा, सांगली येथे झालेल्या जिल्हास्तरीय ग्रामीण सायकलिंग स्पर्धेत लक्ष्मणराव किर्लोस्कर विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज पलूसच्या विद्यार्थी सायकलिंस्टनी दिमाखदार कामगिरी करत १७ वर्षाखालील वयोगटात टाईम ट्रायल प्रकारात वरदराज हिम्मतराव मलमे याने प्रथम क्रमांक पटकावला. १७ वर्षाखालील मास् स्टार्ट स्पर्धा प्रकारात आर्यन संदीप जाधव यानेही प्रथम क्रमांक मिळवला. तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या टाईम ट्रायल स्पर्धेत अक्षदा कैलास मडके हिने द्वितीय क्रमांक पटकावला. तिघांही सायकलिस्ट स्पर्धकांची पुढील विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या स्पर्धेत अथर्व किरण निकम व केतन पुनाजी साबळे यांनी भाग घेऊन कमीत कमी वेळात स्पर्धा पूर्ण केली. प्रशालेचे प्राचार्य अनिल सावंत, यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पुदाले साहेब, उपाध्यक्ष आशाताई पाटील, संदेश कुलकर्णी, सचिव धोंडीराम शिंदे सर यांनी विजेत्या स्पर्धकांचे कौतुक केले. खेळाडूंना क्रीडा शिक्षक दिनकर खोत, जितेंद्र पाटील, संजय कुंभार, दीपक पाटील तसेच हिम्मतराव मलमे, पुनाजी साबळे, सचिन निकम, संदीप जाधव, भीमराव सूर्यवंशी इत्यादींनी मार्गदर्शन केले.

## अंगणवाडी सेविकांचे काम कौतुकास्पद : दिपाली खोत

**मसूर** : महायुती सरकारच्या माध्यमातून जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे २ महिने हप्त्याचे ३००० रुपये हे महिलांच्या खात्यावर येण्यास सुरुवात झाली आहे. कराड-उत्तर विधानसभा मतदार संघातील वाठार किरोली सर्कल, रहिमतपूर नगरपालिका व कन्हेरखेड गण, येथील सर्व आशा सेविका, अंगणवाडी सेविका व या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी असणारे सर्व गावचे ग्रामसेवक व इतर यंत्रणा यांची बैठक कोरेगांव तालुक्याचे तहसीलदार सांगमेश कोडे, कोरेगांव तालुक्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी सुजितकुमार इंगवले यांच्या उपस्थितीत पार पडली.

यावेळी जिल्हा अध्यक्ष भाजपा यांनी कोणतीही अडचण असल्यास आम्ही पूर्ण सहकार्य करू अशी सूचना केली. भाजपा सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश रामकृष्ण वेताळ यांनी महिला सक्षमीकरनासाठी असलेल्या सर्व योजना विषयी माहिती दिली.

दिपाली ताई खोत यांनी सांगितले, आतापर्यंत ९७ लाख ३५ हजार महिलांच्या खात्यावर रक्कम जमा झाली आहे. पैसे जमा करण्याचे काम अविरत युद्ध पातळीवर चालू आहे. तसेच सर्व अंगणवाडी सेविका, आशा सेविका, बचत गट प्रेरिका यांच्या कामाचे कौतुक केले.



**कोरेगाव :** आशा सेविका, अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन करताना दिपाली खोत व्यासपीठावर धैर्यशील कदम, रामकृष्ण वेताळ, व इतर

याप्रसंगी वर्धन ॲग्रो कारखान्याचे कार्यकारी संचालक विक्रमबाबा कदम, रहिमतपूर मंडल अध्यक्ष भीमराव काका पाटील, कराड-उत्तर मंडल अध्यक्ष शंकरराव शेजवळ, किसान मोर्चा महिला जिल्हाध्यक्षा रुक्मिणी जाधव, सरपंच सुनील कांबळे, उपसरपंच ज्ञानदेव गायकवाड, विस्तार अधिकारी प्रशांत जाधव, मंडल अधिकारी गीते, तलाठी, पर्यवेक्षिका प्रज्ञा बेंद्रे, पर्यवेक्षिका, दया पवार, पर्यवेक्षिका लता ननावरे तसेच विविध गावचे ग्रामसेवक अंगणवाडी सेविका, आशा सेविका व सी.आर.पी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा : राशिनकर

**पलूस** : पलूस शहरातील गणेशोत्सव मंडळांनी व घरगुती गणेशोत्सव साजरा करताना तो पर्यावरण पूरक पध्दतीने साजरा करावा, असे नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी निर्मला राशिनकर यांनी केले.

येथील पलूस नगरपरिषदेच्या पुढाकाराने समर्थ इंग्लिश स्कूल सभागृहात आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

मुख्याधिकारी राशिनकर म्हणाल्या, गणेशोत्सव सामाजिक, सांस्कृतिक परंपरा जोपासणारा साजरा करायला हवा.

> **नगरपरिषद तर्फे स्पर्धेचे आयोजन**
>
> - पलूस नगरपरिषदेच्या पर्यावरण पूरक गणेशोत्सव मंडळांसाठी अनोखी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. आमचा बाप्पा इको फ्रेंडली ही स्लोगन घेऊन स्पर्धा घेतली आहे. प्रथम क्रमांकास दहा हजार रुपये प्रमाणपत्र व स्मृती चिन्ह, द्वितीय क्रमांक सात हजार रुपये, पाच हजार रुपये, तीन हजार रुपये व दोन हजार रुपये प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे.

नगरपरिषदेच्या वतीने स्पर्धा आयोजित केली आहे. त्यामध्ये जास्तीत जास्त मंडळ, लोकांनी सहभागी व्हावे.

पलूस नगरपरिषद मार्फत माझी वसुंधरा अभियान ५.० प्राप्त व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरे करणे आवश्यक असून त्या अंतर्गत लाल माती, शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याचे एकदिवसीय प्रशिक्षण पलूस मधील लक्ष्मणराव किर्लोस्कर विद्यालय, पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर हायस्कूल, समर्थ इंग्लिश मिडीयम स्कूल, नवोदय विद्यालय मधील विद्यार्थ्यांना देण्यात आले.




**पलूस :** विद्यार्थ्यांनी तयार केलेले पर्यावरणपूरक गणेश मूर्ती

## नोकरीसाठी गाव सोडले तरी गावाची नाळ तोडू नका : डॉ. धनंजय चव्हाण

### कोपर्डे हवेली युवा मंचच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**मसूर** : युवकांनी फक्त नोकरीच्या मागे न लागता नोकरी देणारे बनावे. समाजावर ओझं बनून राहण्यापेक्षा उद्योग धंद्यासाठी बाहेर पडा. स्वताची प्रगती करून समाजाचीही प्रगती करा. कोपर्डे हवेली गाव हे सुसंस्कृत लोकांचे गाव अशी ओळख निर्माण व्हावी. चांगला विद्यार्थी होताना चांगला माणूस बना. नोकरीसाठी गाव सोडले तरी गावाची नाळ तोडू नका असे प्रतिपादन डॉ धनंजय चव्हाण यांनी केले. ते कोपर्डे हवेली युवामंचच्या वतीने आयोजित दहावी-बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या तसेच वैद्यकीय क्षेत्रातील व स्पर्धा परीक्षेत गावाचा लौकिक वाढवणाऱ्या युवक-युवतींच्या सन्मान सोहळ्यात बोलत होते.

पोलीस उपनिरीक्षक कीर्ती चव्हाण म्हणाल्या, स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य, प्रामाणिक प्रयत्न व संयम ठेवावा यश नक्कीच मिळेल. स्पर्धापरीक्षा देत असताना पालकांची भूमिका देखील महत्वाची असते. अभ्यासातील सातत्य हेच माझ्या यशाचे गमक आहे.



**कोपर्डे हवेली :** डॉ. सुप्रिया चव्हाण यांचा सत्कार करताना डॉ धनंजय चव्हाण, डॉ राजश्री चव्हाण, संजय चव्हाण, डॉ. सचिन चव्हाण व मान्यवर

> आजचे विद्यार्थ्यां उद्याचे उद्योजक, मोठे अधिकारी व्हावेत यासाठी युवामंच च्या वतीने हा सत्कार सोहळा आयोजित करत असतो. पुणे मुंबईत कामासाठी जाणाऱ्या तरुणांना युवामंच कडून जास्तीत जास्त सहकार्य राहिल.
>
> **– डॉ सचिन चव्हाण,**
> **उपाध्यक्ष युवामंच**


यावेळी सरपंच दत्तात्रय चव्हाण, सत्कारमुर्ती मुख्याध्यापिका उषा जगदाळे, युवामंचे संस्थापक अध्यक्ष संजय चव्हाण, उपाध्यक्ष डॉ सचिन चव्हाण, डॉ. श्रीधर बुधे, आबासाहेब चव्हाण, सागर तुपे, अभिजीत चव्हाण, सचिव रमेश चव्हाण, खजिनदार विनोद चव्हाण, सदाशिव पडळकर, एकनाथ पवार, विजय चव्हाण, अभिजीत चव्हाण, संदीप चव्हाण, संभाजी चव्हाण, हर्षल चव्हाण तसेच ग्रामस्थांसह युवा मंचचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी संजय चव्हाण यांनी युवामंच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या सामाजिक कार्याची माहिती दिली. यावेळी सत्कार मुर्ती... यावेळी पोलिस प्रशांत लोहार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी तिसरी ते दहावीमध्ये गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सीमा चव्हाण यांनी केले. आभार डॉ सचिन चव्हाण यांनी मानले.

# ड्रोनच्या घिरट्यांनी धडधड; ग्रामस्थ म्हणे..ही काय भानगड

## वाठार भाग दहशतीखाली : पोलिस प्रशासन सतर्क; जागता पहारा देण्याची ग्रामस्थांवर वेळ



### व्हायरल मेसेजमुळे संभ्रम...

सोशल मिडियावरती ड्रोनच्या रात्रीच्या घिरट्यांबाबत एक मेसेज फिरत आहे. या मेसेजद्वारे सांगण्यात येत आहे की हे ड्रोन सैन्य दलाल पुरवठा करणाऱ्या कंपनीचे असून या ड्रोनची चाचणी सुरू कंपनीमार्फत परिसरात सुरू आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये. अशा प्रकारचा मेसज व्हायरल झाला आहे. यामुळे संबंधितांना याबाबत जाब विचारण्यासाठी ग्रामस्थ घाबरत आहेत. याबाबतचा खुलासा होणे अपेक्षित आहे. संबंधित गावातील अनेक ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाशी याबाबत सविस्तर चर्चा केली आहे. मात्र ड्रोनबाबत निश्चित माहिती अद्याप मिळू शकलेली नाही.

**वाठार** : कराड तालुक्यातील वाठारसह परिसरातील ग्रामस्थ रात्री १० नंतर झोपेत असताना आकाशात ड्रोन घिरट्या घालत आहेत. त्यामुळे झोपेतून खडबडून जागे झालेल्या ग्रामस्थांना झोपमोड करुन ड्रोनवर लक्ष ठेवावे लागत आहे. वारंवार हा प्रकार घडत असल्यामुळे वाठारसह मालखेड, जुने मालखेड, कासारशिरंबे, कालवडे, नांदगाव परिसरातील अनेक गावातील ग्रामस्थ सध्या भितीच्या छायेखाली आहेत.

याबाबत गावातील ग्रामस्थांना ड्रोन वेगवेगळ्या ठिकाणी फिरताना दिसले असल्याचे दावा केला आहे. तसेच ग्रामीण भागात गावातील भागात वेगवेगळ्या ठिकाणी ड्रोन फिरल्याने अनेक चर्चांना उदान आले आहे. याबाबत वस्तूस्थिती समजणे गरजेचे आहे.

गाव पातळीवरती काही गावात या दास्तीने रात्र गस्त सुरू करण्यात आले आहे. पोलीस प्रशासन याबाबत दक्ष असून अजूनही पेट्रोलिंगच्या गाडीच्या गाववार फेऱ्या वाढवणे गरजेचे असल्याचे मत गावातील विविध संस्थाचे पदाधिकारी व ग्रामस्थ करत आहेत.

तसेच या ड्रोन बाबत ग्रामीण पोलीस प्रशासनाने वस्तुस्थिती लोकांच्या समोर मांडावी अशी मागणी या परिसरातून होत आहे. सांगली-सातारा जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश केल्यानंतर मालखेड, जुने मालखेड, कालवडे, बेलवडे बुद्रुक, कासार शिरंबे, वाठार, रेठरे खुर्द, रेठरे बुद्रुक, व रेठरे कारखाना परिसर येत आहे. या ठिकाणी अनेक लहान मोठे व्यवसाय किंवा गावे वसले आहेत. त्या ठिकाणी व्यावसायिकासह ग्रामस्थांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



**कराड** : मनोज माळी व भानुदास डाईंगडे यांना लिंबू सरबत पाजताना अधिकारी.

## आ. बच्चू कडू यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र : मनोज माळी यांचे उपोषण स्थगित

# कराडच्या कॅथलॅबचे नियमबाह्य स्थलांतर थांबवा

## डॉ.राजू शेडगे यांच्यावर प्रशासकीय कारवाईसाठी अहवाल सादर

**कराड** : कराडच्या उपजिल्हा रूग्णालयात मंजुर झालेल्या कॅथलॅबचे नियमबाह्य पद्धतीने सातारला होणारे स्थलांतर रद्द करावे याबाबत आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र दिले आहे. तर वैद्यकीय अधिक्षक डॉ.राजू शेडगे हे खाजगी रूग्णालयात व्यवसाय करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोग्य उपसंचालकांना प्रशासकीय कायवाई साठी अहवाल सादर केल्याचे लेखी पत्र जिल्हा शल्य चिकीस्तक डॉ. युवराज करपे यांनी दिले आहे. आंदोलनातील सर्व मागण्या मार्गी लागल्याने मनोज माळी व भानुदास डाईंगडे यांनी शनिवारी पाचव्या दिवशी उपोषण मागे घेतले.

कराडची कॅथलॅब कराडाच व्हावी यांसह बोगस सुरक्षा रक्षक नेमणूक, बोगस कामगार नोंदणी, खाजगी रूग्णालयात व्यवसाय करणाऱ्या वैद्यकीय अधिक्षकांवर कारवाई करावी तसेच उपजिल्हा रूग्णालयात नातेवाईकांकडून पैसे घेणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी आदी मागण्यांसाठी प्रहारचे मनोज माळी व भानुदास डाईंगडे यांनी उपजिल्हा रूग्णालयासमोर मंगळवार पासून अमरण उपोषण सुरू केले आहे.

याची दखल घेत आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहीत कॅथलॅबचे नियमबाह्य स्थलांतर थाबवून ही कॅथलॅब कराडलाच करण्यासाठी आदेश पारीत करण्याची मागणी केली आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, व सहाय्यक कामगार आयुक्त रेवनाथ भिसले यांनी शनिवारी आंदोलनस्थळी भेट देऊन चर्चा केली यावेळी तहसिलदार कल्पना ढवळे व वरीष्ठ पोलिस निरीक्षक के. एन.पाटील उपस्थित होते.

उंडाळे ग्रामिण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.राजू शेडगे हे गोवारे येथे त्यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या रूग्णालयात खाजगी व्यवसाय करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यासाठी आरोग्य उपसेचालकांना अहवाल सादर केल्याचे लेखी पत्र डॉ.युवराज करपे यांनी दिले आहे. तसेच उपजिल्हा रूग्णालयात नातेवाईकांकडून पैसे घेणाऱ्या एका कर्मचाऱ्याची जिल्हा रूग्णालयात बदली करण्यात आल्याचे लेखी पत्र त्यांनी दिले आहे.

आत्तापर्यंत नोंदणी करण्यात आलेल्या सर्व कामगारांची पडताळणी करण्यात येणार आहे. तसेच नोंदणीसाठी सही शिक्के दिलेल्या सर्व इंजिनिअरना नोटीस बाजावून ते सर्व कामगार त्यांच्याकडे काम करीत असल्याबाबत पुरावे मागवण्यात येणार आहे. तसेच जर बोगस म हिती समोर आली तर त्यांच्यावर कारवई करण्यात येणार आहे व नोंदणी रुद्ध करणार. भांडी वाटपात गैरपकार व पैसे घेतले असल्यास चौकशीत निष्पन्न झाल्यास संमंधित ठेकेदारावरही कारवाई करण्यात येणार आहे. एजंट मुक्त कामगार नोंदणी करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत असल्याचे लेखी पत्र सहाय्यक कामगार आयुक्त रेवनाथ भिसले यांनी दिले आहे व सांगली सुरक्षा रक्षक अध्यक्ष मुजावर यांनी केलेल्या बोगस सुरक्षारक्षक भरतीच अहवाल सोमवारी अप्पर आयुक्त शैलेंद्र पोळ यांना देणार आहे व शैलेंद्र पोळ हे बुधवार पर्यंत त्यांचा अहवाल माननीय आयुक्त कामगार विभाग बांद्रा यांना देणार आहेत. आंदोलनातील सर्व मागण्या मार्गी लागल्याने उपस्थित अधिकाऱ्यांच्या हस्ते सरबत घेऊन उपोषण सोडण्यात आले.

# श्रावणात रेणुका दर्शनासाठी सौंदत्तीत १० लाख भाविक

**बेळगाव** : बेळगाव - श्रावण महिन्यामध्ये दहा लाख भाविकांनी आत्तापर्यंत सौंदत्ती येथील श्री रेणुका देवीचे दर्शन घेतले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात भाविकांनी दर्शन घेतल्याची माहिती मंदिर प्रशासनाने दिली आहे. दरवर्षी डोंगरावर होणाऱ्या चार प्रमुख यात्रांमध्ये लाखो भाविक महाराष्ट्रांनी कर्नाटकात विविध भागातून सौंदत्ती डोंगरावर येतात. त्यामुळे डोंगरावर मोठी गर्दी होते. मात्र यावेळी श्रावण महिन्यात प्रत्येक दिवशी २५ ते ३० हजार तर मंगळवार शुक्रवारी तसेच शनिवार व रविवारी व सुट्टीच्या दिवशी चाळीस ते पन्नास हजार भाविकांनी रेणुका देवीचे दर्शन घेतले आहे.



भाविक दर्शनासाठी गर्दी करत असल्यामुळे लाखोंची आर्थिक उलाढाल होत आहे.श्रावणाला सुरुवात झाल्यानंतर दररोज पहाटे विशेष पूजा व पालखी सोहळा असतो. या सोहळ्यात दररोज चार ते सहा हजार भाविक सहभागी होतात. मात्र गर्दी होऊन देखील परंपरा प्रमाणे सायंकाळी साडेचार ते साडेसहा या वेळेत धार्मिक विधीसाठी मंदिर बंद ठेवले जाते. कोल्हापूर सांगली सह बेळगाव जिल्ह्यातील विविध भागातून आलेल्या भाविकांना देवीच्या दर्शनासाठी एक ते दीड तास अधिक वेळ रांगेत उभे राहावे लागते.मात्र काही महिन्यात डोंगरावर केलेल्या विविध सुविधांमुळे भाविकांची चांगली सोय झाली आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यावेळी श्रावण महिन्यात दर्शनासाठी अधिक प्रमाणात गर्दी झाली आहे. भाविकांना वेळेत दर्शन मिळावे यासाठी सर्व विविध सोयीसुविधा करून दिलेल्या आहेत. श्रावण महिन्यानंतर नवरात्र उत्सवात अधिक गर्दी होत असते. त्या दृष्टीनेही आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. अशी माहिती रेणुका देवी मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस पी महेश यांनी दिली आहे.

# माधुरी मगर हिची कनिष्ठ अभियंतापदी निवड

**दहिवडी** : माण तालुक्यातील मलवडीची सुकन्या माधुरी वंदना विजयकुमार मगर हिची महाराष्ट्र शासनाच्या सरळसेवा परीक्षेतून सातारा जिल्हा परिषदेमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी/पाणीपुरवठा विभागामध्ये कनिष्ठ अभियंता पदी निवड झाली आहे.

मुळातच हुशार, अभ्यासू व जिद्दी असलेल्या माधुरीने सातत्याने स्पर्धा परीक्षांचा अभ्यास केला. अनेकदा अपयशाला सामोरे जावे लागले, अनेक संकटे आली. परंतू ती खचली नाही. तीने आपल्या प्रयत्नात खंड पडू दिला नाही. या तिच्या चिकाटीचे फळ म्हणून ती यशाला गवसणी घालण्यात यशस्वी झाली.गावातील पहिली महिला कनिष्ठ अभियंता होण्याचा मान माधुरीला प्राप्त झाला आहे. माजी पंचायत समिती उपसभापती वंदना मगर व माजी पंचायत समिती सदस्य विजयकुमार मगर यांची माधुरी ही सुकन्या होय. माधुरीची शहिद चौक ते खंडोबा मंदिर अशी मिरवणूक काढण्यात आली. या यशाबद्दल माधुरी हिचे प्रभाकर देशमुख, शेखर गोरे, अनिल देसाई, अभयसिंह जगताप आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.



मला यशाने एकदा नव्हे अनेकदा हूलकावणी दिली. पण मी न खचता पुन्हा ताकतीने संघर्ष केला. माझ्या या प्रवासात माझे मित्रमैत्रिणी, नातेवाईक यांनी मला प्रोत्साहित केले. मी सरकारी अधिकारी व्हावे ही आईवडीलांची तीव्र इच्छा होती. त्यांच्या आशीर्वादानेच मला हे यश प्राप्त झालं. माधुरी मगर, कनिष्ठ अभियंता.



क्रिडारत्न पुरस्कार स्विकारताना संजय जगताप यांच्यासह सरपंच विलास खरात व मान्यवर.

# संजय जगताप क्रिडारत्न पुरस्काराने सन्मानीत

**वरकुटे-मलवडी** : माण तालुक्यातील वरकुटे-मलवडी येथील यशवंतराव चव्हाण हायस्कूलचे क्रिडाशिक्षक संजय बाळासाहेब जगताप यांना कालिरमन फाउंडेशन भारत आणि मान अभियान विकास फाउंडेशन आयोजित मेजर ध्यानचंद महाराष्ट्र क्रीडारत्न पुरस्कार २०२४ प्राप्त झाल्याबद्दल पंचक्रोशीसह माण तालुक्यातून अभिनंदन होत आहे.

संजय सर उर्फ अध्यक्ष अशी सर्वत्र ख्याती असणारे एक परिपक्व अभ्यासू कर्तुत्ववान जेष्ठ नेतृत्व.य.च.हायस्कुलमधून संजय जगताप यांनी अनेक तालुकास्तर,जिल्हास्तर,विभागीयस्तर,राज्यस्तर विद्यार्थी घडविले असून त्यांच्या असंख्य विद्यार्थ्यांनी प्रशासनात उच्च पदाला गवसणी घातली आहे. गोरगरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून वाडीवस्तीतून शाळेला येणाऱ्या गरीब विद्यार्थांना सायकल वाटपासह गणवेश,वह्या,दफ्तर वाटप केले तर शालापयोगी जातीचे प्रमाणपत्र काढून दिले.ज्या विद्यार्थ्यांनी आपले पालक गमावले आहेत त्यांना समाजातील दानशूर व्यक्तींनकडून बॅकेत त्यांच्या नावावरती ठेव पावत्या केल्या,तर दिव्यांग विद्यार्थांना संजीव गांधी योजनेचा लाभ मिळवून दिला.अखंडीतपणे सामाजीक कार्य करताना त्यांनी अनेक गरजू लोकांना पंचायत समिती,जिल्हापरीषद मार्फत येणाऱ्या सर्व योजनांचा लाभ मिळवून दिला.यामध्ये घरकुल,शेतीला लागणारी अवजारांसह शेती उपयोगी साहित्य मिळवून दिले.विकास सेवा सोसायटीचे चेअरमन असताना १०० टक्के वसूली करून सर्व सभासदांना १३% लाभांश मिळवून दिला.संजय जगताप यांनी विद्यार्थांच्या आणि सर्वसामान्य लोकांच्या सेवेसाठी वेळप्रसंगी स्वतःच्या घरासह संसाराकडे दुर्लक्ष केले मात्र गरजू,शोषित पिढीत संमाजाला न्याय देण्यासाठी कटीबध्द आहेत.अश्या ह्या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संजय जगताप सर यांना कालिरमन फाउंडेशन भारत आणि मान अभियान विकास फाउंडेशन आयोजित मेजर ध्यानचंद महाराष्ट्र क्रीडारत्न पुरस्कार -२०२४ प्राप्त झाल्याबद्दल तालुक्यातून अभिनंदन होत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते धिरज जगताप यांनी दिली.

# जातीय सलोखा राखत गणेशोत्सव साजरा करा : अश्विनी शेंडगे

**दहिवडी** : येणारा गणेशोत्सव जातीय सलोखा राखत पार पाडावा सर्व सण-उत्सव नियमांचे पालन करण्यात यावे अश्या सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी शेंडगे यांनी दिल्या.दहिवडी पोलीस स्टेशन हद्दीतील गणेशोत्सव, राजे उमाजी नाईक जयंती, ईद-ए-मिलादच्या आयोजन बैठकी दरम्यान त्या बोलत होत्या.

यावेळी सतीश मडके, रावसाहेब देशमुख, महावितरणचे आर. व्ही. डावरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे आर. बी. सय्यद, कुलदीप डुबल तसेच माण गावोगावचे सरपंच, पोलीस पाटील, गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

शेंडगे पुढे म्हणाल्या, गणेशमंडळांनी मंडळांनी रीतसर नोंदणी करावी. माण खटाव मधील पोलीस पाटलांचे काम सर्वोत्कृष्ट आहे. डिजेचा वापर टाळून पारंपरिक वाद्यांचा वापर करावा.इतर खर्च टाळून सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही बसवावेत. लेझर लाईटच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

दहिवडीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे म्हणाले, यंदा देखील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राबवण्यात येणार आहे.यातून तीन क्रमांक काढून पुरस्कार देण्यात येणार आहेत.

शांतता कमिटी सदस्य रावसाहेब देशमुख म्हणाले,पर्यावरण पूरक गणेशमूर्ती बनवण्याच्या उद्देशाने गावातील कुंभाराना रोजगार मिळू लागला आहे.अष्टविनायक दर्शनाची सोय बिदाल गावात करण्यात आली आहे त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

# अजितदादांच्या पाठीमागे उभे राहणे ही काळाची गरज : खा. नितीन पाटील

**सातारा** : किसन वीर व खंडाळा कारखान्याला थकहमीचे ४६७ कोटी रूपये मिळालेले आहेत. ते फक्त आणि फक्त राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार व कारखान्याचे चेअरमन आमदार मकरंदआबा पाटील यांच्यामुळेच मिळाले आहेत. आतापर्यंत मकरंदआबांनी जी विकासकामे मतदार संघात आणलेली आहेत, त्याला निधी मिळवुन देण्याचे काम अजितदादांनीच केलेले आहे. भविष्याच्या दृष्टीकोनातुन पाहता अजितदादांच्या पाठीमागे उभे राहणे ही काळाची गरज आहे. पश्चिम महाराष्ट्रातील एक दमदार व धडाकेबाज नेतृत्व म्हणुन नामदार अजितदादांकडे पहावे लागेल, असे गौरवोद्गार खा. नितीन पाटील यांनी काढले.

किसन वीर साखर कारखान्याच्या संचालक मंडळ, विविध संस्था व कामगारांच्यावतीने कारखाना कार्यस्थळावर खासदार नितीनकाका पाटील यांची खासदार पदी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रमोद शिंदे, खंडाळा कारखान्याचे चेअरमन व्ही. जी. पवार, व्हाईस चेअरमन राजेंद्र तांबे, जिल्हा बँकेचे संचालक दत्तानाना ढमाळ, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

खासदार नितीनकाका पाटील पुढे म्हणाले की, खंडाळा व किसन वीर कारखान्याची निवडणुक लढविण्याचा माझा विरोधच होता. दोन्ही कारखान्याची परिस्थिती काय होती हे दिसत होतं. सर्व बँका एनपीएत गेल्या होत्या. त्यामुळे कारखान्याचे लिलाव होणार हे दिसून येत होतं. परंतु त्याचवेळी शेतकरी व कामगारांच्या व्यथा ऐकुण घेवुन भावनेपोटी निवडणुक लढविण्याचा निर्णय मकरंदआबांनी घेतला. त्यावेळी कामगारांनाही सांगितलं होतं की संघर्षाची तयारी ठेवली तरच यश मिळेल. त्यापद्धतीने शेतकरी व कामगारांनी साथ दिली व कारखाना ताब्यात घेतला. ज्यावेळी



**खासदार नितीनकाका पाटील यांचा सत्कार करताना कारखान्याचे प्रमोद शिंदे, व्ही. जी. पवार, राजेंद्र तांबे, दत्तानाना ढमाळ, बाबासाहेब कदम व इतर.**

कारखाना ताब्यात घेतला त्यावेळीच कारखाना कर्जातुन बाहेर काढण्याचे मायक्रो प्लॅनिंग केले होते व त्यानुसारच पुढील पावले टाकत होतो. कारखान्याच्या हितासाठी नामदार अजितदादांच्या पाठीमागे जाण्याचा निर्णय घेतला व त्यांनीही शब्द दिलेला होता. अजितदादा शब्दाला पक्के आहेत, त्यामुळेच त्यांनी हा थकहमीचा प्रस्ताव मंजुर केला. आमदार मकरंदआबांच्या सततच्या पाठपुराव्यामुळेच व ताकतीमुळेच आपल्या दोन्ही कारखान्यांची ४६७ कोटींची थकहमी मंजुर होऊन खात्यात वर्ग झालेली आहे. मध्यंतरी वर्तमानपत्रात थकहमीवर स्थगिती आल्याचे वृत्त प्रसिद्ध झालेले होते. ते ऐकुण काहींना आनंद झालेला होता. माझे त्यांना एकच सांगणं आहे की, तुम्हाला आमचा द्वेष आहे, तो तुम्ही राजकारणाच्या माध्यमातुन व्यक्त करा. पण कुणाच्या कुणाच्या अन्नात माती कालवण्याचे पाप करू नका. निवडणुकीच्या माध्यमातून सामोरे या जनता त्यावर उत्तर देईलच. राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रीत असताना पवार साहेबांनी व तदनंतर अजितदादांनी लोकसभा लढविण्याचे संकेत दिलेले होते. परंतु महायुतीतील निर्णयामुळे सातारची जागा राष्ट्रवादीला मित्रपक्षाला द्यावी लागलेली होती. वाईच्या सभेमध्ये अजितदादांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे मला खासदार बनविले. आमच्या कुटुंबावर सर्वांनी भरभरून प्रेम केलेले आहे. याचे सर्व श्रेय कोणाला जात असेल तर स्व. तात्यांना. सर्वसामान्य जनसामान्यांच्या मनामध्ये तात्यांनी आपले स्थान निर्माण केलेले होते, लोकांना तात्यांकडे जाण्यासाठी वेळेचे बंधन नव्हते. तेच स्थान आज आमदार मकरंदआबांनी निर्माण केलेले आहे. आज जी थकहमीची रक्कम मिळाली ती केवळ आमदार मकरंदआबांच्या ताकतीच्या जोरावरच मिळालेली आहे. खासदारकीच्या माध्यमातून जिल्ह्यासह वाई-खंडाळा-महाबळेश्वर तालुक्यातील विकासांच्या कामांचा महामेरू वाढविण्याचे काम करण्याचा नक्कीच प्रयत्न माझ्याकडून केला जाणार असल्याची ग्वाहीही यावेळी खासदार नितीनकाका पाटील यांनी दिली.

किकली गेटपासून खासदार नितीनकाकांना गजराच्या निनादात मेनगेटपर्यंत आणले. त्यांनतर कारखान्यातील आबासाहेब वीर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मेनगेट ते कार्यक्रम स्थळापर्यंत जेसीबीतुन पुष्पवृष्टी करण्यात आली. औक्षण झाल्यानंतर कार्यक्रमाच्या सुरूवातीला खासदार नितीनकाकांची साखरतुला करण्यात आली. तद्नंतर कारखान्याच्या संचालक मंडळाच्यावतीने, सातारा सहकारी औद्योगिक तोडणी वाहतुक संस्था, कामगार युनियन, किसन वीर पतसंस्था, आबासाहेब वीर पतसंस्था, कामगार कल्याण मंडळ, कारखान्यातील विभागवाईज, कार्यक्षेत्रातील आलेल्या शेतकऱ्यांनी व कार्यकर्त्यांमार्फत सत्कार करण्यात आला.